**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः07.10.2023** **वारःशनिवार**

---

**ठळक बातम्या**

येत्या दोन वर्षात नक्षलवादाचा समूळ नायनाट करण्याचा केंद्राचा संकल्प – केंद्रीय गृहमंत्री अमित शहा

रिझर्व बँकेच्या द्वैमासिक पतधोरणात रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम

सर्व सरकारी रुग्णालयातली रिक्त पदं भरण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला निर्देश

मुंबईतील आग दुर्घटनेत 7 जणांचा मृत्यू, पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांकडून आर्थिक मदतीची घोषणा

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंची आतापर्यंत 96 पदकांची कमाई

आणि

पुण्या-मुंबईतून मान्सून माघारी परतल्याची हवामान विभागाची माहिती

**शाह शिंदे गृहविभाग बैठक**

नक्षलवाद रोखण्यात गेल्या काही वर्षांमध्ये यश आलं असून येत्या दोन वर्षात देशातून नक्षलवादाचा समूळ नायनाट करण्याचा केंद्र सरकारचा संकल्प आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नक्षलवाद रोखण्यासंदर्भात नवी दिल्लीत आयोजित बैठकीत ते काल बोलत होते. गेल्या चार दशकांच्या तुलनेत 2022 मध्ये सर्वात कमी हिंसाचार आणि मृत्यू नोंदवले गेले, अशी माहिती शहा यांनी यावेळी दिली.या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह देशातील अन्य नक्षलग्रस्त राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. एकीकडे नक्षलवाद्यांचा प्रतिबंध करताना दुसरीकडे गेल्या वर्षभरात नक्षलग्रस्त भागात विविध विकासाच्या योजना परिणामकारकपणे राबवल्यामुळे गडचिरोलीसारख्या भागातील नक्षलवाद पूर्णपणे संपवण्यात राज्य सरकारला यश येईल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. इंटरनेटच्या माध्यमातून समाज माध्यमांद्वारे शहरी नक्षलवाद फोफावत आहे, त्याला रोखण्यासाठी एक सक्षम यंत्रणा निर्माण करणं गरजेचं आहे असंही मुख्यमंत्री म्हणाले.

## रिझर्व बँक धोरण

भारतीय रिझर्व बँकेने काल द्वैमासिक पतधोरण जाहीर केलं. या धोरणात रेपो दरामध्ये कोणताही बदल न करता तो साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. सलग चौथ्यांदा रिझर्व बँकेनं रेपो दरात कोणताही बदल केलेला नाही. मुंबईत झालेल्या द्वैमासिक आढावा बैठकीनंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी काल ही माहिती दिली. चालू आर्थिक वर्षात महागाईचा दर पाच पूर्णांक चार टक्के राहण्याचा अंदाज दास यांनी व्यक्त केला आहे.

## शासकीय रुग्णालय मृत्यू

राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही जागा रिक्त राहणार नाहीत, याची खबरदारी घेण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. दोन आठवड्यांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय साहित्य खरेदी प्राधिकरणाच्या, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे निर्देशही मुख्य न्यायाधीश डी के उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठानं दिले आहेत. नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये दोन दिवसांमध्ये शासकीय रुग्णालयातल्या 50हून अधिक रुग्णांच्या झालेल्या मृत्यू प्रकरणी न्यायालयानं स्वतःहून दखल घेत राज्य सरकारला नोटीस जारी केली होती, त्यावर काल सुनावणी झाली. हे सर्व रुग्ण अत्यंत गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल झाले होते, या प्रशासनाच्या उत्तरावर न्यायालयानं नाराजी व्यक्त केली.दरम्यान, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं या प्रकरणी राज्याच्या मुख्य सचिवांना नोटीस बजावली आहे. तसंच चार आठवड्यांमध्ये या प्रकरणी सविस्तर अहवालही आयोगानं मागवला आहे. या दुर्घटनेला जबाबदार असलेल्यांवर केलेली कारवाई आणि पीडित कुटुंबांना दिलेल्या मदतीबद्दलची माहितीही आयोगानं मागवली आहे.

## गोरेगाव दुर्घटना

मुंबईतील गोरेगाव इथल्या उन्नत नगर परिसरात एका सात मजली इमारतीला गुरुवारी रात्री उशीरा लागलेल्या आगीत सात जणांचा मृत्यू झाला असून 30 पेक्षा अधिक लोक जखमी झाले आहेत. या घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या असून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची तर जखमींना प्रत्येकी 50 हजारांची मदत जाहीर केली आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे, तसंच मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य शासनाकडून करण्यात येणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे. मुख्यमंत्र्यांनी काल रात्री या घटनास्थळाची पाहणी केली आणि दुर्घटनेतील जखमींची विचारपूस केली.

## मराठा समिती दौरा

मराठा कुणबी, कुणबी मराठा जातीचं प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबद्दलची कार्यपद्धती ठरवणाऱ्या समितीचे अध्यक्ष आणि समितीचे सदस्य 11 ते 23 ऑक्टोबर दरम्यान छत्रपती संभाजीनगर विभागाचा दौरा करणार आहेत. या काळामध्ये या समितीचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्यासह समितीचे सदस्य सर्व पुरावे, वंशावळी, दस्तावेज या सगळ्याचा आढावा घेणार आहेत.

## राष्ट्रवादी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीसंदर्भात आणि पक्षावरील हक्कासंबंधी, दिल्लीत निवडणूक आयोगाच्या कार्यालयात काल सुनावणी झाली. यासंदर्भातली पुढची सुनावणी येत्या 9 तारखेला होणार आहे.

## निवेदन

हवाई दल दिनानिमित्त उद्या 8 ऑक्टोबर रोजी सकाळी 7 वाजून 10 मिनिटांनी हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल विवेक राम चौधरी यांचा संदेश आकाशवाणीवरून प्रसारित केला जाणार आहे. त्यामुळे पुणे केंद्रावरील प्रादेशिक बातम्या उद्या सकाळी 7 वाजून 20मिनिटांनी प्रसारित केल्या जातील.

## पुणे मेट्रो

पुणे मेट्रोनं विद्यार्थ्यांसाठी एक पुणे विद्यार्थी पास हे मेट्रो कार्ड सुरू केलं आहे. पुणे मेट्रोतून दैनंदिन प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही प्रीपेड सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी मेट्रोनं HDFC बँकेबरोबर भागीदारी केली आहे. ऐकुया या विषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**एक पुणे विद्यर्थी पास हे बहुउद्देशीय कार्ड आहे आणि ते मेट्रोच्या प्रवासाबरोबरच भारतात कुठेही रिटेल पेमेंटसाठी वापरलं जाऊ शकतं. 13 ते 18 वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना भारतातील इतर कोणत्याही मेट्रो आणि बस सेवांसाठी हे कार्ड वापरता येणार आहे. हे एक स्पर्शविरहित कार्ड आहे. विद्यार्थ्यांकडे पॅन कार्ड नसेल तर एक ई-फॉर्म भरून एक पुणे विद्यर्थी पास मिळवता येईल. कार्डधारक विद्यर्थ्याला तिकीट दरामध्ये 30 टक्के सवलत मिळेल. याची  वैधता 3 वर्षे असून हे कार्ड अहस्तांतरणीय आहे. याद्वारे 2 हजार रुपयांपर्यंतचे कोणतेही व्यवहार सहज करता येऊ शकतात. दर दिवसाला 20 व्यवहारांची मर्यादा यामध्ये देण्यात आली आहे. पहिल्या दहा हजार विद्यार्थ्यांना एक पुणे विद्यर्थी पास मोफत दिला जाणार असून त्यानंतरच्या कार्डची किंमत 150 रुपये आणि वार्षिक शुल्क 75 रुपये असेल.  आकाशवाणी बातम्यांसाठी श्रद्धा वार्डे सह वैष्णवी कारंजकर पुणे.**

## वानरांचा बंदोबस्त

कोकणातल्या शेतकऱ्यांना प्रचंड त्रासदायक ठरत असलेल्या वानरांचा कायमचा बंदोबस्त करण्याच्या मागणीसाठी रत्नागिरी तालुक्यातल्या गोळपमधले सामाजिक कार्यकर्ते ॲडव्होकेट अविनाश काळे यांनी पाच ऑक्टोबरपासून सुरू केलेलं उपोषण पालकमंत्री उदय सामंत यांच्या आश्वासनानंतर काल स्थगित केलं. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासमवेत शेतकऱ्यांची बैठक घेऊन तोडगा काढू असं आश्वासन सामंत यांनी दिलं. कोकणातल्या या समस्येबाबत बोलताना अविनाश काळे म्हणाले.......

**वन्य प्राणी संरक्षण कायद्यामुळे वानर आणि माकडांना संरक्षण मात्र त्यामुळे गेल्या 35 ,40 वर्षात या प्राण्यांचा शेती आणि बागायती मध्ये मोठा उपद्रव निर्माण केला आहे. शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवलेली पिकं माकड आणि पक्षांच्या टोळ्या येऊन खून टाकतात , आंबा , चिक्कू , पेरू  सारखी फळ ही शेतकऱ्यांच्या हाती लागत नाही . घरांवरून ही मुक्त संचार असल्याने घरांचे कौलांचे त्यांनी नुकसान केले आहे , सर्व बाजूनी होणार हे नुकसान टाळण्यासाठी वानर आणि माकादानाचा योग्य तो बंदोबस्त व्हायला हवा. अन्यथा कोकणाचे कोकण पण टिकवणारा हा निसर्ग माणसाच्या हाती लागणार नाही. शेतकऱ्यांच दररोज होणार नुकसान शासनाने कितीही भरपाई दिली तरी भरून निघणार नाही.**

## वर्धापनदिन

आकाशवाणी सांगली केंद्राचा 60वा वर्धापन दिन काल मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्तानं आयोजित अनौपचारिक स्नेहमेळाव्यात राज्याच्या विविध जिल्ह्यातील श्रोतेही मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

## सी एच आरोग्य सेवा परिषद

ग्रामीण भागात आरोग्य सेवा देणाऱ्या पश्चिम विभागातील प्रादेशिक समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची दुसरी परिषद कालपासून नाशिकमध्ये सुरू झाली. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार आणि प्राध्यापक एस पी सिंग बघेल यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन झालं. सर्वांसाठी आरोग्य सुविधा ही केंद्राची संकल्पना राबवण्यासाठी समुदाय आरोग्य अधिकारी महत्त्वाचं योगदान देत असल्याचं भारती पवार यावेळी म्हणाल्या.

**आशियाई**

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं आतापर्यंतची सर्वाधिक 96 पदकं जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. यात 23 सुवर्ण, 34 रौप्य आणि 39 कास्य पदकांचा समावेश आहे. काल हॉकीमध्ये भारताच्या पुरुष संघानं जपानचा 5-1 नं पराभव करत सुवर्ण पदक जिंकलं. तिरंदाजीमध्ये ज्योती सुरेखा हिनं सुवर्णपदक जिंकल्याचं वृत्त नुकतंच हाती आलं आहे.

**हवामान**

मान्सूननं परतीचा प्रवास याआधीच सुरू केला असून काल मुंबई, नागपूर आणि पुण्यातून मान्सून माघारी परतल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. राज्याच्या जवळपास 45 टक्के भागातून मान्सून परतला आहे, त्यामुळे राज्यात बहुतांश भागांत येत्या दोन दिवसात हवामान कोरडं राहील. तर 12 ऑक्टोबरपर्यंत कोकणात काही भागांत हलका पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार...**